# जीएचएच ०२९ स्ट्राँग कॉटन हायब्रिडचा भारतात

## श्रीराम बायोसीड जेनेटिक्सने मध्य व दक्षिण भागातील भारतीय शेतकऱ्यांसाठी नवे कॉटन

**प्रतिनिधी / १ जून**

**अमरावती** -जीएचएच ०२९ बीजीआयआय हे नव्याने दाखल करण्यात आलेले श्रीराम बायोसीड जेनेटिक्सचे उत्पादन मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून महाराष्ट्रातील खान्देश, विदर्भ व मराठवाडा येथील शेतकऱ्यांमध्ये विशेष स्थान निर्माण करत आहे. सन १९९२ मध्ये स्थापन झालेली, श्रीराम बायोसीड जेनेटिक्स ही कंपनी उच्च उत्पन्न देणारे हायब्रिड बियाणे विकसित करून शेतकऱ्यांचे सबलीकरण करण्यासाठी कार्यरत आहे. कंपनीकडे स्वत:चे वैविध्यपूर्ण जर्मप्लासम असून, कंपनी भारत, इंडोनेशिया, थायलंड, व्हिएतनाम, बांगलादेश, चीन, नेपाळ, कम्बोडिया व नेपाळ येथील शेतकऱ्यांनाही सेवा देत आहे.



बायोसीड शेतकऱ्यांना सक्षम करण्याचे उद्दिष्ट बियाण्यांच्या संपूर्ण मूल्यसाखळीद्वारे करत आहे म्हणजे, संशोधन व विकास, विविध ठिकाणी चाचण्या, उत्पादन, प्रक्रिया व मार्केटिंग. हैदराबाद येथे मुख्यालय असणारी ही कंपनी डीसीएम श्रीराम लि. या प्रतिष्ठित समूहाचा भाग आहे. गेले काही दिवस, 'युवा' व 'बिंदास' या अगोदरच्या उत्पादनांनी देशातील शेतकऱ्यांमध्ये जसे नाव निर्माण केले आहे, त्याप्रमाणे कॉटन हायब्रिड जीएचएच ०२९ बीजीआयआय हे नवे उत्पादन दाखल करण्यामध्ये कंपनीचे अधिकारी व्यस्त आहेत. नव्याने दाखल करण्यात आलेले हायब्रिड जीएचएच ०२९ बीजीआयआय हे खरेतर कामगारांची चणचण असण्याच्या सध्याच्या काळामध्ये शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी दाखल करण्यात आले आहे.

अनेक वर्षे, घातक कीटकांना प्रतिरोध व उत्पन्न हे आमच्या कॉटन हायब्रिडचे वेगळेपण आहे, असे कंपनी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. त्यांनी सांगितले, परंतु, अलीकडच्या काळात, देशातील अनेक भागांतील शेतकऱ्यांना कामगारांची चणचण ही समस्या भेडसावत आहे. या चणचणीमुळे वाढत असणारा कामगारांचा खर्च कमी करण्यासाठी बायोसीडने नवीन हायब्रिड जीएचएच ०२९ बीजीआयआय दाखल केले असून, त्यामार्फत कापसाच्या बोंडाच्या आकार वाढवला आहे. यामुळे कापूस काढणे सोपे होते. अगोदरच्या उत्पादनात सुधारणा करून हे उत्पादन तयार केले आहे. त्यामध्ये, कीटकांचा प्रतिरोध व उत्पन्न हे वैशिष्ट्य कायम ठेवले आहे, तसेच कापसाच्या बोंडाचा मोठा आकार व चांगले वजन ही वैशिष्ट्ये समाविष्ट केली आहेत. कंपनीतील अधिकाऱ्यांच्या उत्साहावरून दिसून येत असल्याप्रमाणे, पहिल्याच वर्षी हे उत्पादन महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, कर्नाटर व तामिळनाडू येथे विकले जाणार असल्याने जीएचएच ०२९ बीजीआयआय देशात स्वत:चे स्थान निर्माण करण्यासाठी सज्ज आहे. महाराष्ट्रातील अमरावती, औरंगाबाद व जळगाव येथे आणि तेलंगणातील वारंगळ येथे यशस्वीपणे दाखल करण्यात आलेल्या या उत्पादनाला वर नमूद केलेल्या राज्यांमध्ये २०१९ मधील खरिप हंगामात इरिगेटेड व हाय मॅनेजमेंट सेग्मेंट यामध्ये विस्तारण्यासाठी व स्थान मिळवून देण्यासाठी उत्तम पुरवठा जाळ्याचे पाठबळ दिले जाणार आहे.